**(CNR-MHAH21-000548-2014)**

**नियमित दिवाणी दावा क्र.१३०/२०१४ मधील नि.१८ खालील**

**आदेश.**

१. वादीने प्रस्तुतचा दावा दिवाणी पोटगीची रक्कम ठरवून मिळणेकरीता व ठरलेल्या रकमेचा बोजा दावा मिळकतीवर ठेवणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी नि.क्र.१८ वर न्यायालयाच्या अधिकाराबाबत प्राथमिक मुद्दा निश्चित करण्यासाठी अर्ज दाखल केलेला होता. सदर अर्जावर दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राबाबत मुद्दा काढणेत आलेला होता. दोन्ही पक्षांनी न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रावर कोणताही तोंडी अथवा लेखी पुरावा दिलेला नाही.

२. प्रतिवादींचे विधीज्ञ श्री. गोले आणि वादीचे विधीज्ञ श्री. मुरुमकर यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

३. दाव्यात दाखल असलेल्या कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दावा मिळकत ही कर्जत येथे स्थित आहे, परंतु वादीने दिवाणी पोटगीची रक्कम मिळणेकरीता प्रकरण दाखल केलेले आहे. वादी जामखेड येथील रहिवासी असल्यामुळे वादीला प्रस्तुतचा दावा दिवाणी पोटगी मिळणेकरीता दाखल करता येतो, म्हणून प्रतिवादीने दाखल केलेल्या अर्जात खालील आदेश पारित करत आहे.

**: आदेश :**

प्रतिवादींचा नि.क्र.१८ चा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

सही/—

(हाश्मी एच.ए.एच.आय.)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
जामखेड.

दिनांक : ०४/०७/२०१८.